अग्रलेखांचा बादशहा नवा काळ
संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
नवा काळ
।। न मे भक्तः प्रणश्यति ।।
अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# अति आत्मविश्वास नेईल सत्तेचा घास

हाता-तोंडाशी आलेला घास शांतपणे स्वीकारण्याऐवजी फाजील वल्गना करून तो घालवण्याचे काम भारतीय जनता पार्टीने यापूर्वी अनेकवेळा केले आहे. आतादेखील अति आत्मविश्वासाचे प्रदर्शन सुरू आहे. अजून कशात काय आणि फाटक्यात पाय अशी परिस्थिती असताना नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्याच्या थाटात ज्या मुलाखती देत आहेत. भाषणे ठोकीत आहेत ती पाहिल्यावर हाच फाजील आत्मविश्वास भाजपाचा ऐनवेळी घात करू शकतो. मोदींनी काही मुलाखतींमध्ये जी मुक्ताफळे उधळली त्यावरून त्यांना पंतप्रधान होण्याची घाई झाली आहे हे तर दिसतेच. परंतु काही महत्त्वाच्या समस्या सोडवण्याबाबत त्यांच्याकडे कोणतीही ठोस कृतीशील योजना नाही हे स्पष्ट होते. कसलेला नेता विचारलेल्या प्रश्नाला जसा परतवून लावतो त्या पध्दतीने मोदी प्रश्नांना उत्तरे देतात. विशेष म्हणजे त्यांना कोणताही विषय गंभीर किंवा अडचणीचा वाटत नाही. एकजात सगळ्या प्रश्नांची उत्तरे त्यांच्याकडे असतात. गेल्या ५० वर्षांत न सुटलेला काश्मीर प्रश्नाबाबतही ते हा प्रश्न कायमचा निकाली काढण्याची भाषा करतात. जगभर रोजगाराच्या प्रश्नारून युध्द होईल, असे मोदी यांचे भाकीत आहे. भारताला त्यासाठी तयार राहावे लागेल, असा इशाराही ते देतात. अगदी फॉरिन पॉलिसीपासून ते दहशतवादापर्यंत सीबीआयला स्वायत्तता देण्यापासून ते आता काँग्रेसचा कसा विनाश होणार आहे इथपर्यंत ते अनेक प्रश्नांची बिनधास्तपणे उत्तरे देतात. मात्र सामान्य माणसाला भेडसावणाऱ्या महागाईबाबत परदेशात पडून असलेल्या काळ्या पैशाबाबत मोदींच्या तोंडून कोणताही शब्द बाहेर पडत नाही केवळ विकासाचा मुद्दा रेटून-रेटून गरिबांना त्राही-त्राही करून सोडणाऱ्या प्रश्नांविषयी आज तरी मोदींकडे उत्तर दिसत नाही. म्हणूनच अनेक भाषणांमध्ये मुलाखतींमध्ये या प्रश्नांना ते स्पर्शच करीत नाहीत. आज देशापुढे इतके गंभीर प्रश्न आहेत की, त्याबाबत फार विचारपूर्वक योजनापूर्वक उपाययोजना करावी लागेल. काही प्रश्नांना इतके कंगोरे आणि बाजू असतात की, ती ते सोडवितानासुद्धा आणखी नव्या समस्या निर्माण होतात. परंतु मोदींना त्याचा विचार करावासा वाटत नाही. त्यांच्या या राजकीय उत्तराचे वानगीदाखल एकच उदाहरण आम्ही देतो.

## दोन जागा मिळवणारा भाजपा

आता दहशतवादाबाबत मोदी म्हणतात की, तो सहन केला जाणार नाही. म्हणजे त्यासाठी त्यांनी तिथे टॉलरन्स हा शब्द वापरला मात्र दहशतवाद रोखण्याकरता स्पष्ट आणि कायद्याची चौकट आवश्यक आहे असे ते सुचवितात. पण ही कायद्याची चौकट आणखी काय असावी, याचा खुलासा ते करीत नाहीत. म्हणजेच शब्दांचा फेरफार करून उत्तरे दडपून देण्यात मोदींचा हातखंडा दिसतो. राजकीयदृष्ट्या असेच त्यांचे एक उत्तर गंमतीशीर आणि समोरच्या पक्षात तुच्छ लेखणारे आहे. या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला एकूण शंभर जागाही मिळणार नाहीत. शंभरी गाठता येणार नसल्याने गांधी घराण्याच्या नेतृत्वालाच धोका निर्माण होईल, अशी त्यांची भविष्यवाणी आहे आता त्यांचे हे उद्गार असेच अति आत्मविश्वास दाखवणारे आणि समोरच्या विरोधी पक्षाला कमी लेखणारे ठरतात. काँग्रेसला शंभरीदेखील गाठता येणार नाही इतकी काँग्रेसची नक्कीच वाईट परिस्थिती नाही आणि जर तशी परिस्थिती असती तर मोदींना किंवा एकूण भाजपाला जास्तीत जास्त जागा मिळवण्यासाठी एवढी उठापठक करावी लागली नसती. याचा अर्थ इतके टोकाचे काँग्रेसविरोधी वातावरण नाही किंवा इतके भाजपाची लोकप्रियतेची चिन्हेही नाहीत, असे असताना काँग्रेसला शंभर जागाही मिळणार नाहीत. असे म्हणणे अनाठायी आत्मविश्वास असल्याचे द्योतक ठरते. कदाचित निकालामध्ये काँग्रेसची परिस्थिती भाजपापेक्षा वाईट असू शकेल, परंतु कुठल्याही निवडणुकीत विरोधी पक्षाला किंवा समोरच्या पक्षाला इतके कमी लेखणे योग्य ठरत नाही. काँग्रेसनेदेखील आतापर्यंत इतक्या निवडणुका झाल्या, परंतु भारतीय जनता पक्षाला किती जागा मिळतील याचे जाहीर भाष्य केले नव्हते. मात्र प्रत्यक्ष निवडणुकीत दोनशे जागा लढवणाऱ्या भाजपाला केवळ दोन जागा मिळाल्या होत्या. ती परिस्थिती लक्षात घेतली तर आपला प्रचार करणे हा एक वेगळा भाग असतो आणि समोरच्या पक्षाला कमी लेखणे वेगळे. कारण प्रचार करताना तारतम्य बाळगायला हवे. किंवा कोणत्याही प्रकारचे राजकीय भाष्य करताना दुसऱ्याची ताकद आजमावण्याचे धाडस करणे जोखमीचे ठरू शकते. परंतु सध्या मोदी हे जवळपास जिंकल्यासारखे आणि आपण पंतप्रधान झाल्यासारखेच वावरत आहेत. १६ तारखेच्या निकालात प्रत्यक्ष वस्तुस्थिती काय आहे हे स्पष्ट होईल. आमचे एवढेच म्हणणे आहे की, मोठ्या राजकीय नेत्यांनी तरी आपल्या बोलण्यावागण्यातून प्रगल्भता दाखवली पाहिजे.

## स्वत:च्या जागांची सोय करा

सध्याच्या वातावरणात मतदारांना परिवर्तन हवे आहे हे स्पष्टपणे दिसते. ते पूर्णपणे भाजपाच्या बाजूचे आहे किंवा नाही याची कोणीही खात्री देऊ शकलेले नाही कदाचित आज उद्याच्या मतदानोत्तर चाचणीतून त्याबाबतची थोडीफार दिशा दिसून येईल. तोपर्यंत भाजपाने आणि त्यांच्या नेत्याने स्वत:च्या आत्मविश्वासाला आवर घातला पाहिजे. एकीकडे निवडणुकीत तब्बल पंचवीस पक्षांशी भाजपाने हातमिळवणी केली. आणि दुसरीकडे मात्र स्वत:च्या ताकदीवर सरकार बनवण्याची भाषाही केली जाते आहे. हा परस्पर विरोधाभास दिसून येतो. स्वत:विषयीची जर एवढी खात्री होती तर मग पंचवीस जणांबरोबर युती करण्याची भाजपाला गरज का पडली. आता काँग्रेसला किती जागा मिळतात हा खरे तर प्रश्नच उरत नाही. भाजपाने आपली परिस्थिती सांभाळण्याचा प्रयत्न करावा कारण मित्र पक्षांची गर्दी आणि स्वत:च्याच पक्षातील हमरीतुमरी याच्याशीदेखील नरेंद्र मोदींना सामना करावा लागणार आहे. त्यामुळे काँग्रेसच्या जागांपेक्षा आपल्याला मिळालेल्या जागा सत्तेच्या चौकटीत कशा शाबूत राहतील याचीच मोदींनी विवंचना केलेली बरी अन्यथा इथेदेखील हाच अति आत्मविश्वास सत्तेचा घास पळवून नेणारा ठरू शकतो. १६ तारखेच्या निकालानंतर नरेंद्र मोदी यांचे दुसरे रूप लोकांना पाहायला मिळेल कारण त्यांच्या आतापर्यंतच्या मुलाखतींवरून त्यांचा दिसून आलेला आत्मविश्वास आणि निकालानंतरच्या परिस्थितीवरून त्यांच्या वागण्याबोलण्यात पडणारा फरक यात बरेच अंतर दिसून येईल.